AVIVA
INDUSTRIES LTD

Date: 14/02/2024

To,
**BSE Ltd**
Phiroze Jeejeebhoy Tower,
Dalal Street Fort,
Mumbai – 400001

**Subject: Intimation under Regulation 30 and Regulation 47 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulation, 2015**

Dear Sir/Ma'am,

With reference to the subject referred Regulation, we would like to inform you that the Unaudited financial results for quarter and nine month ended December 31, 2023 has been published in The Business Standard Newspaper in English on 13th February, 2024 & Tarun Bharat Newspaper in Marathi on 13th February, 2024. A copy of the said newspaper advertisements are enclosed for your reference & record.

Please take note of the same.

**For AVIVA INDUSTRIES LIMITED**

BHARVIN SURESHBHAI PATEL

Digitally signed by BHARVIN SURESHBHAI PATEL
DN: c=IN, o=Personal, postalCode=380052, st=Gujarat, serialNumber=54B41C690F2A7CAF8B09DF944C0CD94CF83199E8E1045526C7B2BCA9BFEE191D, cn=BHARVIN SURESHBHAI PATEL
Date: 2024.02.14 13:03:35 +05'30'

**Bharvin Patel**
**Managing Director**
**DIN: 01962391**

**Place: Ahmedabad**



# कुर्ल्यात माघी गणपतीचे स्वागत

**मुंबई :** कुर्ला पश्चिम सुंदरबाग येथे 'युवा प्रतिष्ठान'तर्फे माघी गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात येते. 'सुंदरबागचा महाराजा' म्हणून लौकिक असलेल्या श्रींच्या मूर्तीचे आगमन सोमवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी मिरवणुकीने आणि उत्साही वातावरणात झाले. यावेळी 'आरटीआय' कार्यकर्ते आणि मंडळाचे सल्लागार अनिल गलगली, शैलेश सिंह, शुभम कांबळे, अश्विन सनी ठाकूर, दीपक गायकवाड, प्रसाद नजरकर, अनिरुद्ध पुजारी, महेश कचवे, अक्षय व्हटकर आदी तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# 'आगे आगे देखो होता है क्या!'

## देवेंद्र फडणवीस यांचे सूचक वक्तव्य; काँग्रेसच्या २ नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश

**मुंबई, दि. १२: प्रतिनिधी**

सर्वच पक्षांचे चांगले आणि बडे नेते आमच्या संपर्कात आहेत. 'आगे आगे देखो होता है क्या', असे सूचक वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी केले.

प्रभाग क्र. ८२ मधून दोन टर्म काँग्रेसचे नगरसेवक म्हणून निवडून आलेले आणि उत्तर मध्य जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष जगदीश कुट्टी अमिन आणि प्रभाग क्र. २१६ चे माजी नगरसेवक राजेंद्र नरवणकर यांनी सोमवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुंबई भाजप अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांच्यासह कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार पराग अळवणी, प्रसाद लाड, भालचंद्र शिरसाट, अमरजीत मिश्र आणि माजी नगरसेवक मुरजी पटेल आदी यावेळी उपस्थित होते.



देवेंद्र फडणवीस यांनी नाव न घेता उद्धव ठाकरे यांना टोला लगावला. ते म्हणाले की, ''मुंबईकडे काही जण सोन्याची अंडी देणारी कोंबडी म्हणून पाहत होते. मुंबईसाठी यांनी काहीच केले नाही. 'कोविड'मध्ये जेव्हा मुंबईकर उपचारासाठी धडपड होते, तेव्हा हे लोक भ्रष्टाचार करीत होते. मृतांच्या टाळूवरचे लोणी खाणे म्हणजे काय, हे यांनी दाखवून दिले आहे. अशा भ्रष्टाचारातून मुंबईकरांची सुटका करून जेव्हा निवडणूक होईल. तेव्हा, भाजप महायुतीचा विजय निश्चित होईल,'' असा विश्वास व्यक्त करत फडणवीस यांनी भाजपमध्ये प्रवेश केलेल्या दोन्ही माजी नगरसेवकांचे स्वागत केले.

### अनेक मोठे नेते भाजपच्या संपर्कात

"ज्यांचा जनतेशी कनेक्ट आहे, असे अनेक मोठे नेते भाजपच्या संपर्कात आहेत. ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकास यात्रेत सहभागी होण्यास इच्छुक आहेत. येत्या काळात जनतेशी कनेक्ट असलेल्या नेत्यांनाच संधी दिली जाईल.

**– देवेंद्र फडणवीस,**
उपमुख्यमंत्री

# पर्यावरणपूरक स्मशानभूमीसाठी निधी

**मुंबई :** पर्यावरणपूरक आणि आधुनिक यंत्रणांचा वापर करून मुंबईतील सर्व स्मशानभूमी प्रदूषणमुक्त करण्यात येणार आहेत. पालिका यासाठी 'एलपीजी'वरील आधारित प्रदूषण नियंत्रण प्रकल्प राबवणार आहे. पालिकेने यासाठी अर्थसंकल्प २०२३-२४ मध्ये १,७१६.८५ कोटी इतकी तरतूद खर्चाची भरीव तरतूदही केली आहे. तसेच यासाठी निविदा प्रक्रियाही पालिकेने सुरू केली आहे. मुंबईतील काही मोठ्या स्मशानभूमींचे काम सुरू करण्यात आले आहे. देवनार (गोवंडी), डहाणूकरवाडी (कांदिवली), शिवाजी पार्क (दादर), भोईवाडा (परळ) या स्मशानभूमींचा समावेश आहे.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**निविदा सुचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग, मुलुंड कार्यालयाअंतर्गत असणारे लघुदाब व उच्चदाब वाहिन्या आणि वितरण रोहीत्रे यांच्या ब्रेकडाऊन देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी एक वर्षाच्या करारासाठी आणि नवीन वीज जोडणी देणे (NSC) निविदेसाठी स्थानिक परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नामिकाप्रविष्ट (Empanelment) करणेसाठी ई-निविदा क्रमांक ई-१२, ई-१३, ई-१४ आणि ई-१५ एकूण ४ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. ०५.०२.२०२४ ते २०.०२.२०२२४ (संध्याकाळी १८:०० वा.) पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारीख दि. २१.०२.२०२४ (सकाळी ११:०० वा.) पर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत/शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या वेबसाईटवर प्रकाशित केला जाईल.

**कार्यकारी अभियंता**
**सं. व सु. विभाग, मुलुंड**

## थोडक्यात

### स्वाती होलमुखे 'आदर्श मुख्याध्यापिका पुरस्कारा'ने सन्मानित



**मुंबई :** छत्रपती शिवाजी विद्यालय (इंग्रजी माध्यम) धारावी या शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती होलमुखे यांना त्यांच्या शिक्षणासाठी समर्पित कार्याबद्दल नुकतेच 'आदर्श मुख्याध्यापिका पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. मुंबई मराठी शिक्षक संघ आणि जुनी पेन्शन संघर्ष समिती, छबिलदास हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने स्वाती होलमुखे यांचा सन्मान करण्यात आला. छबिलदास हायस्कूल दादर सभागृहात झालेल्या या कार्यक्रमप्रसंगी अनिल बोरनारे, रावजी राणे, छत्रपती शिवाजी विद्यालय माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वीणा डोणवलकर आदी उपस्थित होते.

### करी रोड येथील इमारतीच्या खिडकीची ग्रील कोसळली



**मुंबई :** दक्षिण मुंबईतील करी रोड विभागातील पिंपाळेश्वर कृपा या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील एका खोलीच्या खिडकीची ग्रिल अचानक कोसळली. अचानक घडलेल्या या घटनेमुळे इमारतीत एकच खळबळ माजली. सुदैवाने यात कोणतीही दुर्घटना घडली नसली तरी ग्रीलमधील वातानुकूलित यंत्रणेच्या मशीनचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे.

# वनवासी कुटुंबांना मिळाल्या त्यांच्या हक्काची जमिनी

**मुंबई, दि. १२: प्रतिनिधी**

सातत्याने झालेले शोषण, त्यातून अनुभवलेली पीडा, वनवासी बांधवांनी केलेले अनुभवकथन ऐकून जणू 'सह्याद्री' अतिथीगृहसुद्धा आज पाणावले होते. त्याचवेळी एका ऐतिहासिक आणि संवेदनशील क्षणाचे साक्षीदारसुद्धा सह्याद्रीला व्हायचे होते. सावकारांच्या जाचातून सोडविलेली जमिनीची मालकी १७ कातकरी कुटुंबांना परत मिळाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा यासाठी पुढाकार अतिशय महत्त्वपूर्ण ठरला. या कुटुंबांना सोमवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी जागांचे सातबारे देण्यात आले.

पालघर, रायगड जिल्ह्यातील काही वनवासींची अशीच अवस्था झाली आहे. अवघे २०० रुपये हाती ठेवून सावकारांनी बळकाविलेल्या जमिनी सोडविण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी २०१९ मध्ये एक समिती गठीत केली होती. या कामाला गती देण्यासाठी चावडी वाचनाचे आदेशही दिले होते. त्यानुसार मूळ मालकांना जमिनी परत मिळाल्या.

गेल्याच आठवड्यात सह्याद्रीवर वनवासींच्या या समस्यांवर एक बैठक देवेंद्र फडणवीस यांनी घेतली होती, त्यानंतर १७ जणांना सातबारा देण्याचा कार्यक्रम पार पडला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, आदिवासी विकास सचिव विजय वाघमारे, विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी आदी उपस्थित होते.

### शासकीय खर्चाने होणार सीमांकन

देवेंद्र फडणवीस यांनी केवळ सातबारे दिले नाहीत, तर त्यांची पुढचीही व्यवस्था करून दिली. आता त्यांना जागेचा ताबा द्या, शासकीय खर्चाने त्यांच्या जागेवर मालकी पाट्या लावून द्याव्या, योग्य सीमांकन आखून द्या, असे निर्देशसुद्धा देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

"संविधानाने त्यांना दिलेले अधिकार. पण, त्यांना त्यापासून वंचित राहवे लागले. त्यांचे जे होते, तेच त्यांना परत केले. हा गुलामीतून मुक्त करण्याचा कार्यक्रम आहे. आता खऱ्या वनवासींना सर्व लाभ मिळावे, असा 'जीआर' जारी करा. भविष्यात कुणी जमिनी हडपू शकणार नाही, अशी व्यवस्था पोलिसांनी उभारावी. वनवासी समाजाच्या पाठीशी सरकार ठामपणे उभे आहे.

**– देवेंद्र फडणवीस,**
उपमुख्यमंत्री

# येत्या निवडणुकीत मुंबईचा शिक्षक आमदार भाजपचाच होणार

## डॉ. राजू बंडगर यांचा विश्वास



**मुंबई, दि. १२: प्रतिनिधी**

येत्या निवडणुकीत मुंबईचा शिक्षक आमदार भाजपचाच होईल, तसेच शिक्षक निश्चितच परिवर्तन घडवून आणतील, असा विश्वास भाजपचे शिक्षक आघाडीचे मुंबई अध्यक्ष डॉ. राजू बंडगर यांनी व्यक्त केला. भारतीय जनता पक्ष शिक्षक आघाडीच्यावतीने दादर येथील 'वसंतस्मृती' या पक्ष कार्यालयात आयोजित शिक्षक स्नेहमेळाव्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी भाजपचे आमदार कालिदास कोळंबकर, भाजप मुंबई उपाध्यक्ष राजेश हाटले, भाजप मुंबई सचिव प्रतीक कर्पे, नगरसेविका सुरेखा पाटील, भाजप व भटक्या विमुक्त आघाडीचे मुंबई अध्यक्ष आनंद कुराडे आदी उपस्थित होते. मुंबईमधील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन मुंबईतच करावे. शिक्षकांना तातडीने 'कॅशलेस मेडिक्लेम योजना' लागू करावी. १०, २० व ३० वर्षे सेवेची 'आश्वासित प्रगती योजना' शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करावी, रात्रशाळांना पूर्णवेळ शाळांचा दर्जा द्यावा, अतिरिक्त शिक्षकांना देण्यात येणारी 'बीएलओ'ची ड्युटी तसेच अन्य अशैक्षणिक कामांमधून वगळावे यांसारख्या विविध मागण्यांसह अनेक ठराव या स्नेहमेळाव्यात मांडण्यात आले.

भारतीय जनता पक्षाच्या सरकारने शिक्षकांसाठी केलेल्या कामांचा आढावा आमदार कालिदास कोळंबकर यांनी घेतानाच शासन शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे मत व्यक्त केले. शिक्षक स्नेहमेळाव्यास मुंबईमधील संस्थाचालक, मुख्याध्यापक आणि शिक्षक – शिक्षकेतर कर्मचारी हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. 'पवित्र' पोर्टलच्या माध्यमातून महायुती सरकारने शिक्षक पदभरती सुरू केलेली आहे. सद सदर स्नेहमेळाव्यात सांस्कृतिक कार्यक्रमाचे निवेदन किशोर खरात यांनी तर सूत्रसंचालन सोपान मोरे यांनी केले.

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**(म्हाडाचा घटक)**
म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना (2nd Call)**

कार्यकारी अभियंता (शहर) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३९, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ (दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४८४) हे जिल्हा उप निबंधक/शहर/मुंबई शहर जिल्हा यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकूण **१५** कामाकरीता **बी-१** (टक्केवारी) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. विस्तृत निविदा सूचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. निविदा विक्री **दिनांक १४.०२.२०२४ सकाळी १०.०५ पासून दिनांक २१.०२.२०२४ सायंकाळी ५.३५ पर्यंत** राहील. निविदा सुचनेबाबत शुद्धिपत्रक/बदल असल्यास https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (शहर), मुं.झो.सु.मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
**कार्यकारी अभियंता (शहर),**
**मुं.झो.सु.मंडळ, मुंबई**

CPRO/A/162

म्हाडा-गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

# राज्य सांस्कृतिक पुरस्कारांचे आज वितरण

**मुंबई, दि. १२: प्रतिनिधी**

सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण मंगळवार, दि. १३ फेब्रुवारी रोजी होणार आहे. 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान'मध्ये सायंकाळी ६.३० वाजता आयोजित या कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर उपस्थित राहणार आहेत.

२०२३ साठीचा 'ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार' हभप नारायण जाधव यांना 'भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार' २०२२ साठी पं. उल्हास कशाळकर आणि २०२३ साठी पं. शशिकांत (नाना) श्रीधर मुळे 'नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार' २०२२ साठी सुहासिनी देशपांडे आणि २०२३ साठी अशोक 'समेळ संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार' २०२२ साठी नयना आपटे आणि २०२३ साठी पं. मकरंद कुंडले 'तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार' २०२१ साठी हिराबाई कांबळे आणि २०२२ साठी अशोक पेठकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय २०२२ आणि २०२३ साठीचे राज्य सांस्कृतिक पुरस्कारही या समारंभात प्रदान केले जाणार आहेत.

२०२३ च्या राज्य सांस्कृतिक पुरस्कार मानकऱ्यांमध्ये ज्योती सुभाष (नाटक), पं. ऋषिकेश बोडस (उपशास्त्रीय संगीत), रघुनंदन पणशीकर (कंठसंगीत), कीर्तनकार भाऊराव थुटे महाराज (लोककला), शाहीर राजू राऊते (शाहिरी), सदानंद राणे (नृत्य), निशिगंधा वाड (चित्रपट), अमृताश्रम स्वामी महाराज (हभप अमृतमहाराज जोशी) (कीर्तन /समाजप्रबोधन), शशिकांत सुरेश भोसले (वाद्यसंगीत), यशवंत रघुनाथ तेंडोलकर (कलादान), उमा खुडे (तमाशा) आणि सुरेश नाना रणसिंग (आदिवासी गिरीजन) यांचा समावेश आहे.

# स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या 'अमृत-महोत्सव सन्मान सोहळ्या'चे आयोजन!

**मुंबई, दि. १२: प्रतिनिधी**

'स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक' आणि 'हिंदू जनजागृती समिती'च्या संयुक्त विद्यमाने 'श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासा'चे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेवगिरी महाराज यांच्या 'अमृत-महोत्सव सन्मान सोहळ्या'चे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता 'स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक', शिवाजी पार्क, दादर येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते स्वामी गोविंददेवगिरी महाराज यांचा सन्मान करण्यात येणार आहे.



या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे शालेय शिक्षणमंत्री तथा मुंबई शहराचे पालकमंत्री दीपक केसरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष रणजित सावरकर, खासदार राहुल शेवाळे, भाजपचे मुंबई प्रदेश अध्यक्ष आमदार आशिष शेलार, भाजपचे प्रवक्ते तथा आमदार अतुल भातखळकर, शिवसेनेचे मुख्य प्रतोद आमदार भरत गोगावले, पत्रकार सुरेश चव्हाणके, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे मुंबई अध्यक्ष प्रवीण दीक्षित, हिंदू जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ता रमेश शिंदे आणि अन्य मान्यवर उपस्थित असतील, अशी माहिती 'स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक' आणि 'हिंदू जनजागृती समिती' यांच्या संयुक्त प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे. ५०० वर्षांनंतर अयोध्येत उभ्या राहिलेल्या भव्य श्रीराम मंदिराच्या निर्माणामध्ये स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांनी मोलाचे योगदान दिले आहे. वयाच्या १७ व्या वर्षांपासून श्रीमद्भागवत, रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी यांद्वारे लोकशिक्षणाचे कार्य स्वामीजींनी केले आहे

earc®
**एनकोअर असेट रिकन्स्ट्रक्शन**
**कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (एनकोअर एआरसी)**
५ वा मजला, प्लॉट क्र. १३७, सेक्टर ४४, गुरुग्राम - १२२००२, हरयाणा

**(कोणताही पूर्वग्रह न ठेवता)**

एनकोअरएआरसी/ॲम्बिट/जीसी/२३२४/०२०१ दिनांकः ०९.०२.२०२४

**१. मे. गजानन कन्स्ट्रक्शन (कर्जदार); २. श्री. दिनेश शंकरराव देशमुख (प्रोप्रायटर आणि गहाणवटदार); ३. सौ. मीनाक्षी दिनेश देशमुख (जामीनदार आणि गहाणवटदार)**; डी-५०४, सुंदर नगर, न्यू मनिषा नगर, गजानन महाराज मंदिरासमोर, मोहिंदर हायस्कूल रोड, कल्याण पश्चिम - ४२१३०१.
**४. श्री. पांडुरंग नरहरी चौधरी (जामीनदार)** मु. पोष्ट खराडे, तालुका शहापूर, जि. ठाणे - ४२१६०१. **५. श्री. सिताराम महादेव सूर्याराव (जामीनदार)** मु. पो. सायले, तालुका मुरबाड, जि. ठाणे - ४२१४०१. **६. श्री. दर्शन सुनिल देशमुख (जामीनदार)** मु. पो. शिरोशी, तालुका मुरबाड, जि. ठाणे - ४२१४०२.

प्रिय महोदय/महोदया.

**विषयः मे. गजानन कन्स्ट्रक्शन (कर्जदार) यांच्या खात्याच्या तारण मालमत्तेच्या, जिचा सांकेतिक ताबा सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ ("सरफैसी कायदा") च्या कलम १३(४) सहवाचिता नियमनांअंतर्गत घेण्यात आला आहे, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२च्या नियमन ९ (१) च्या शर्तीसह वाचावयाच्या नियमन ८ (६) ("नियमन") अन्वये करावयाच्या जाहीर ई-लिलाव विक्रीकरिता सूचना.**

आपणास माहीत असल्यानुसार, सरफैसी कायद्याच्या तरतुदींच्या अनुषंगाने, एनकोअर असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी प्रा. लि. (**"एनकोअर एआरसी"**) यांनी कल्याण जनता सहकारी बँक लिमिटेड (केजेएसबीएल) द्वारे कर्जदारास मंजूर केलेले वित्त सहाय्य व त्यासह खालील सर्व प्रतिभूती नोंदणीकृत नियुक्ती करारनामा दिनांक २६.०३.२०१८ द्वारे संपादित केले आहे.

एनकोअर एआरसीद्वारे वित्त सहाय्य संपादित करण्यापूर्वी, एनकोअर एआरसीने तुम्हाला सरफैसी कायदा, २००२च्या कलम १३ (२) अन्वये दि. ११.०७.२०१८ रोजी सूचना जारी केली होती व त्याद्वारे त्यामध्ये उल्लेखित देण्यांचा भरणा करण्याचा सल्ला दिला होता. तुम्ही सरफैसी कायदा, २००२च्या कलम १३(२) अन्वये पारित केलेली सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांमध्ये देण्यांचा भरणा करण्यास अयशस्वी ठरल्याने आणि त्याकडे दुर्लक्ष केल्याने, एनकोअर एआरसीच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी खाली दिलेल्या तपशिलानुसार स्थावर तारण मालमत्तेचा दि. २९.०६.२०१९ रोजी सांकेतिक ताबा घेतला आहे.

वरील बाबी पाहता, आम्ही याद्वारे नियमनांच्या नियम ९(१) च्या शर्तीसह वाचावयाच्या नियमन ८ (६) अन्वये तुम्हाला सूचना देतो की, एनकोअर एआरसीचे प्राधिकृत अधिकारी याखाली अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेली तारण मालमत्ता दि. २१.०३.२०२४ रोजी जाहीर ई-लिलावाद्वारे विक्री करणार आहेत. पंधरा दिवसांच्या सूचना कालावधीच्या समाप्तीनंतर, प्राधिकृत अधिकारी त्यानुसार नियमनांच्या नियमन ९ (१) सह वाचावयाच्या नियमन ८ (६) च्या शर्तींअंतर्गत जाहीर ई-लिलावाच्या सूचनेच्या प्रसिद्धीकरिता पावले उचलतील. तारण मालमत्तेचे वर्णन, निश्चित केलेली राखीव किंमत आणि इसारा रक्कम अनामत खाली उल्लेखिल्यानुसार आहेः

| अ.क्र. | तारण मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत | ईएमडी (रु.मध्ये) |
|---|---|---|---|
| १. | गाव धनोरी शिवार तालुका बोडवड जिल्हा जळगाव येथे स्थित, गट क्र. ४३/२ धारण केलेली औद्योगिक जमीन, एकूण क्षेत्रफळ १९,१०० चौ.मी. आणि चतुःसीमा खालीलप्रमाणेः पूर्वेस किंवा त्यादिशेनेः गाव पिंपळगाव (खुर्द)च्या सीमा, पश्चिमेस किंवा त्यादिशेनेः गट क्र. ४४, दक्षिणेस किंवा त्यादिशेनेः गट क्र. ४३ (पी), उत्तरेस किंवा त्यादिशेनेः गट क्र. ४३/१ (श्री. दिनेश शंकरराव देशमुख यांच्या नावे)<br>आणि<br>गाव धनोरी शिवार तालुका बोडवड जिल्हा जळगाव येथे स्थित, गट क्र. ४३/३ धारण केलेली औद्योगिक जमीन, एकूण क्षेत्रफळ १९,१०० चौ.मी. आणि चतुःसीमा खालीलप्रमाणेः पूर्वेस किंवा त्यादिशेनेः गाव पिंपळगाव (खुर्द)च्या सीमा, पश्चिमेस किंवा त्यादिशेनेः गट क्र. ४४, दक्षिणेस किंवा त्यादिशेनेः गट क्र. ४७, उत्तरेस किंवा त्यादिशेनेः गट क्र. ४३/३ (श्री. दिनेश शंकरराव देशमुख यांच्या नावे)<br>आणि<br>गाव धनोरी शिवार तालुका बोडवड जिल्हा जळगाव येथे स्थित, गट क्र. ६८/२ धारण केलेली औद्योगिक जमीन, एकूण क्षेत्रफळ १०,१०० चौ.मी. आणि चतुःसीमा खालीलप्रमाणेः पूर्वेस किंवा त्यादिशेनेः गट क्र. ६८/१, पश्चिमेस किंवा त्यादिशेनेः निवृत्ती ढसाळ यांच्या मालकीची जमीन, दक्षिणेस किंवा त्यादिशेनेः प्रभाकर विश्वनाथ यांच्या मालकीची जमीन, उत्तरेस किंवा त्यादिशेनेः गोपाळ सोनार यांच्या मालकीची जमीन (श्री. दिनेश शंकरराव देशमुख यांच्या नावे) | रु. ८६,९४,०००/- | रु. ८,६९,४००/- |

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्ती नियमनांच्या नियमन ९(७) नुसार एनकोअर एआरसीची वेबसाईट म्हणजेच http://www.encorearc.com आणि http://sarfaesi.auctiontiger.net/EPROC वर देखील अपलोड करण्यात येतील.

सही/-
(विरेंद्र घनवट) - प्राधिकृत अधिकारी
एनकोअर असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी प्रा. लि.

दिनांकः १२.०२.२०२४

# 'बेस्ट'च्या प्रवाशांचा सुरक्षित, प्रिमिअम प्रवास

## 'चलो'ची 'बेस्ट एअरपोर्ट एक्सप्रेस' बस सेवा सुरू

**मुंबई, दि. १२ प्रतिनिधी**

'चलो'ची 'बेस्ट एअरपोर्ट एक्सप्रेस' बस सेवा सोमवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी सुरूझाली असून त्यामुळे 'बेस्ट'च्या प्रवाशांचा आता सुरक्षित आणि प्रिमिअम प्रवास होणार असल्याची माहिती 'बेस्ट' प्रशासनाच्यावतीने देण्यात आली. प्रवाशांना त्यांच्या विमानतळ प्रवासादरम्यान येणाऱ्या विविध आव्हानांना लक्षात घेऊन या बसेस सार्वजनिक वाहतूक सेवा देण्यास सज्ज झाली आहे.

एअरपोर्टएक्सप्रेसविमानतळावर आणि तेथून दररोज २३० ट्रिप चालवेल. मार्च २०२४ पर्यंत ५० टक्के बस आधीच इलेक्ट्रिक असून



आता यापुढे १०० टक्के इलेक्ट्रिक बस चालविण्यात येणार आहे. एअरपोर्ट एक्सप्रेस सेवा सोमवार ते रविवार सुरू राहणार असून विमानतळावरून सकाळी ६.३० वाजता सुरू होणाऱ्या या बसची रात्री ११ वाजता शेवटची बस सुटेल. दोन्ही दिशांना अंदाजे ३० मिनिटांच्या अंतराने बस धावणार आहेत.

प्रवाशांना विमानतळाच्या दोन्ही टर्मिनल्सच्या बाहेर एअरपोर्ट एक्सप्रेस काउंटर मिळू शकतात जेथून ते त्यांचे तिकीट बुक करू शकतात. 'बेस्ट चलो' ॲपद्वारे कन्फर्म सीटदेखील बुक करू शकतात. जर एखाद्या प्रवाशाने आरक्षण केले असेल तरच विमानतळ एक्सप्रेस मार्गावर थांबेल.

"एअरपोर्ट एक्सप्रेस सेवेमुळे मुंबईच्या विमानतळाच्या प्रवासाचा अनुभव हा आरामदायक असणार आहे. एक्सप्रेस मार्ग, विमानतळ आणि विमानतळाला मुंबईच्या सर्व कानाकोपऱ्यांशी जोडणारी प्रमुख शहरे, दक्षिणेकडील कुलाबा, उत्तरेला बोरिवली, ईशान्येकडील उपनगरातील ठाणे आणि खारघर नवी मुंबई या मार्गावर ही बस धावेल.

**– मोहित दुबे ,**
मुख्य कार्यकारी अधिकारी 'चलो'

**एअरपोर्ट एक्सप्रेस मार्ग आणि वेळापत्रक**

| मार्ग | भाडे | वारंवारता | पहिली बस | शेवटची बस |
|---|---|---|---|---|
| एस १०४ विमानतळ- कुलाबा | १७६ रु. | दर ३० मिनिटांनी | सकाळी ७.०० वा. | सकाळी १० वा. |
| एस १०५ विमानतळ- खारघर | २७६ रु. | | सकाळी ६:४५ वा. | सकाळी ९:३० वा. |
| एस १०६ विमानतळ- ठाणे | २०१ रु. | | सकाळी ६:३० वा. | रात्री ११ वा. |
| एस १२४ विमानतळ - बोरिवली | १५१ रु. | | सकाळी ६:५० वा. | रात्री १०:१५ वा. |

AVIVA INDUSTRIES LTD

**AVIVA INDUSTRIES LIMITED**
CIN: L51100MH1984PLC034190
**Reg Office:** 4th Floor, Jaya Talkies, S. V. Road, Opp. Indraprastha, Borivali (W). Mumbai 400092
**Corp. Office:** C-3/1001, Anushruti Tower, Near Jain Temple, Opp. New York Tower, Nr. Thaltej Cross road, S.G Highway Ahmedabad 380054. E-mail: aviva.amd@gmail.com • website: www.avivaindustries.com

**UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED DECEMBER 31, 2023** (in Lacs)

| Sr. No. | Particulars | Quarter ending 31/12/2023 (Unaudited) | Quarter ended September 30, 2023 (Unaudited) | Corresponding 3 months ended in the previous year 30/09/2022 (Unaudited) | NINE MONTHS ENDED 31/12/2023 (Unaudited) | NINE MONTHS ENDED 31/12/2022 (Unaudited) | For the year ended on March 31, 2023 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Total income from operations | 0.00 | 20.35 | 32.05 | 49.9 | 60.25 | 69.15 |
| 2. | Net Profit / (Loss) for the period before tax (before Exceptional and/or Extraordinary items#) | -2.23 | -0.36 | 0.75 | -1.17 | 1.32 | 1.04 |
| 3. | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | -2.23 | -0.36 | 0.75 | -1.17 | 1.32 | 0.59 |
| 4. | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | -2.23 | 3.01 | 0.75 | 1.83 | -3.96 | -4.15 |
| 5. | Equity Share Capital | 149.9 | 149.9 | 149.9 | 149.9 | 149.9 | 149.9 |
| 6. | Earnings Per Share (of Rs. 10 /- each) (for continuing and discontinued operations) - 1. Basic: | (0.15) | (0.02) | 0.05 | (0.10) | 0.05 | 0.04 |
| | 2. Diluted: | (0.15) | (0.02) | 0.05 | (0.10) | 0.05 | 0.04 |

Note: **(A)** a. The above is an extract of the detailed format of quarter and ninth month ended 31.12.2023 Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the websites of the Stock Exchange(s) and the listed entity https://avivaindustries.com/ **(B).** The impact on net profit / loss, total comprehensive income or any other relevant financial item(s) due to change(s) in accounting policies shall be disclosed by means of a footnote. **(C)** Exceptional and/or Extraordinary items adjusted in the Statement of Profit and Loss in accordance with Ind-AS Rules / AS Rules, whichever is applicable.

Date : February 10, 2024
Place : Ahmedabad

On Behalf of Board of Director **For, Aviva Industries**
**Bharvin Patel (Managing Director)**
DIN: 1962391